महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला स्वयं सहाय्यता समूहांच्या वस्तु व उत्पादन विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यामध्ये "उमेद मॉल (जिल्हा विक्री केंद्र)" उभारणी करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः जिविके-२०२५/प्र.क्र.१७(भाग१)/ई- १३३२२१६/ योजना-१

बांधकाम भवन, तळमजला २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक: २ जानेवारी ,२०२६

**संदर्भ:-**

१. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.जिविके-२०२५/प्र.क्र.१७/ई-९९८२३१/योजना-१, दि.११.०८.२०२५ व सम क्रमांकाचे दि.०१.०१.२०२६ रोजीचे शासन शुद्धिपत्रक.
२. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे पत्र क्र.एमएसआरएलएम / उपजीविका/कार्य-१८/जा.क्र.२७४९/२०२५, दि.०९.०९.२०२५.

**प्रस्तावना :-**

"महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान" या अभियानाची अंमलबजावणी ३४ जिल्ह्यातील ३५१ तालुक्यांमध्ये करण्यात येत आहे. त्या अंतर्गत सद्यस्थितीत स्वयं सहाय्यता गटातील महिला त्यांच्या उपजीविका रोजगारासाठी छोटे-छोटे लघुउद्योग करतात आणि त्यामाध्यमातून विविध वस्तु व उत्पादनांची मोठ्या प्रमाणात निर्मिती करत आहेत. या निर्मिती करण्यात आलेल्या वस्तु व उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी "महालक्ष्मी सरस" या माध्यमातून, जिल्हा व विभागस्तरावर सरस आणि विविध ठिकाणी भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शन, तसेच आठवडी बाजारातील स्टॉलद्वारे सुध्दा महिलांना त्यांच्या वस्तु व उत्पादने विक्रीसाठी प्रोत्साहित करण्यात येते. तसेच यासाठी, "उमेदमार्ट" या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मची निर्मिती व ॲमेझॉन, फ्लिपकार्ट इत्यादी ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर देखील गटांची नोंदणी करण्यात येत आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला स्वयं सहाय्यता समूहांच्या वस्तु व उत्पादन विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यामध्ये "उमेद मॉल (जिल्हा विक्री केंद्र)" उभारणी करण्याबाबत दि.२९.०७.२०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार संदर्भ क्र.१ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार संदर्भ क्र.२ येथील प्राप्त प्रस्तावातील पहिल्या टप्प्यातील १३ जिल्ह्यांची "उमेद मॉल" उभारण्यासाठी निवड करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

## शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला स्वयं सहाय्यता समूहांच्या वस्तु व उत्पादन विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात निम्न नमुद १३ जिल्ह्यांमध्ये "उमेद मॉल (जिल्हा विक्री केंद्र)" उभारणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्हाचे नाव |
|---|---|---|
| १. | पुणे | १. सातारा<br>२. पुणे<br>३. सोलापूर |
| २. | कोकण | १. रत्नागिरी- खेड<br>२. ठाणे-अंबरनाथ |
| ३. | नाशिक | १. जळगाव-भुसावळ |
| ४. | छत्रपती संभाजीनगर | १. छत्रपती संभाजीनगर<br>२. बीड<br>३. धाराशीव-तुळजापूर |
| ५. | अमरावती | १. यवतमाळ<br>२. अकोला |
| ६. | नागपूर | १. नागपूर<br>२. वर्धा |

उपरोक्त नमुद जिल्ह्यांमध्ये "उमेद मॉल" (जिल्हा विक्री केंद्र) उभारणीबाबत अमंलबजावणीची कार्यपद्धती संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१०२१२०९५९७१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VARSHA M BHAROSE

Digitally signed by VARSHA M BHAROSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2F3096A175796CC670522C4AFF97DA20B708981B5122E87C8346C4CC7468F821, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1BD844032884BBF2167BC99CD85325223ACEEF69D02BD455B7CA6972491623E0, cn=VARSHA M BHAROSE
Date: 2026.01.02 16:12:40 +05'30'

(व. मुं. भरोसे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा. मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. विधान सभा/ विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई.
९. महालेखापाल (लेख व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई नागपूर.
१०.मा. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन प्रशाकीय विभाग (सर्व).
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई.
१२. संचालक अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३. संचालक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४. विभागीय आयुक्त (सर्व).
१५. जिल्हाधिकारी (सर्व).
१६. जिल्हा कोषगार अधिकारी, सर्व.
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१८. सर्व सहसचिव/ उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. उप सचिव, नियोजन (का-१४११ व १४१४) मंत्रालय मुंबई.
२०.वित्त विभाग (का. व्यय-१५ व अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.
२१. अपर आयुक्त (विकास), सर्व, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
२२. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व.
२३. अवर सचिव/कार्यासन अधिकारी, कार्यासन योजना-२/योजना-३/वित्त-१.
२४. निवड नस्ती (कार्यासन योजना- १).